(महाराष्ट्र शासन)

Government Medical College, Jalna

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना

**पत्ता :** ग्लोबल गुरुकूल शाळा, सुशिलादेवी लॉन समोर, अंबड मंठा रोड, जालना, पिन ४३१२१३

जा.क्र.शावैमजा/आस्था-राजप-१-२/जाहिरात/जुलै-२०२६/ 1805 /२०२६ दिनांक- 13 JUL 2026

## जाहीरात

मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जालना या आस्थापनेवरील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, यांचे रिक्त पदे विभागीय निवड मंडळ व स्थानिक निवड मंडळाव्दारे तात्पुरुत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता भरणे करिता उमेदवारांकडुन स्वतंत्ररित्या अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्जाचे कोरे नमुने संस्थेच्या www.gmcjalna.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदरील अर्ज दिनांक १५/०७/२०२६ ते दिनांक २९/०७/२०२६ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत पर्यंत उपलब्ध असतील संकेतस्थळावरुन अर्ज डाऊनलोड केल्यानंतर अर्जातील नमुद परिपुर्ण माहिती (शैक्षणिक कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह) दि. ३०/०७/२०२६ सायंकाळी ५.०० पर्यंत किंवा त्यापुर्वी (सार्वजनिक सुट्टी वगळुन) रुपये २००/- शासकीय पावती भरुन हस्तपोच आवक विभागात स्विकारण्यात येईल.

सदर प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक पदाची मुलाखत दिनांक ०४/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जालना यांच्या दालनात आयोजित करण्यात आलेली आहे. अधिक माहितीकरिता सदर जाहिरात महाविद्यालयाच्या www.gmcjalna.org मा.संचालनालयाचे संकेतस्थळ- www.med-edu.in व जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचे संकेतस्थळ-www. jalna.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### प्राध्यापक संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशील

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| ०१ | बालरोग चिकित्साशास्त्र | MD / DNB Paediatrics | ०१ |
| ०२ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | MD/DNB Skin & VD | ०१ |
| ०३ | क्षयरोग व उररोगशास्त्र | MD/ DNB T.B. Chest | ०१ |
| ०४ | शल्यचिकित्साशास्त्र | MS / DNB - General Surgery | ०१ |
| ०५ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | MD / DNB - Orthopedics | ०१ |
| ०६ | कान,नाक व घसाशास्त्र | MD / DNB ENT | ०१ |

### सहयोगी प्राध्यापक संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशील१

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| ०१ | मनोविकृतीशास्त्र | MD / DNB Phychiatry | ०१ |
| ०२ | कान,नाक व घसाशास्त्र | MD / DNB ENT | ०१ |
| ०३ | क्ष-किरणशास्त्र | MD// DNB Radiology DNB (Radio - Diagnosis) DNB (Radio - Diagnosis) (Radiology) | ०१ |

प्राध्यापक, व सहयोगी प्राध्यापक, संवर्गातील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचा अर्जाचा स्विकार करुन उमेदवारांची मुलाखात घेऊन पात्र उमेदवारांचे अर्ज मा.आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडे नियुक्तीच्या पुढील कार्यवाहीकरिता सादर करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

### सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशील

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| ०१. | शरिररचनाशास्त्र | १. As per notification १४.०२.२०२२ & ३०.०६.२०२५ postgraduate degree MD/MS/DNB in concern subject.<br>२. Experience of Senior Resident or Tutor of १ Year in the concerned subject in a recognized medical /institution<br>३. Should have completed or required to undergo the basics course in biomedical research<br>४. Should have completed or required to undergo basics course in Medical Education Technology from institutions designated by NMC. | ०२ |
| ०२. | शरीरक्रिया शास्त्र | | ०२ |
| ०३. | जीवरसायनास्त्र | | ०२ |
| ०४ | औषधशास्त्र | | ०२ |
| ०५ | न्यायवैद्यकशास्त्र | | ०१ |
| ०६ | विकृतीशास्त्र | | ०१ |
| ०७ | बालरोगचिकित्साशास्त्र | | ०१ |
| ०८ | त्वचा व गुप्तरोग | | ०१ |

**प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक या पदाकरिता निवडीची कार्यपध्दती व पात्रता :-**

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक करार पध्दतीने नियुक्तीसाठी कोणत्याही वयोगटाची यथास्थिती भारतीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवार ( बिगर सेवानिवृत्त ) पात्र असतील.

२) उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

**०३. शैक्षणिक पात्रता :-**

A. उमेदवाराने संबंधित विषयातील एम.डी./एम.एस/डी.एन.बी./ही पदव्युत्तर अर्हता किंवा त्यास समकक्ष पदव्युत्तर अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातुन उत्तीर्ण केलेली असावी. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषद व भारतीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या मानंकानुसार अर्हता प्राप्त. (३०/०६/२०२५ च्या अधिसुचनेनुसार)

B. तसेच उमेदवार भारतीय वैद्यकीय परिषद, १९५६ नुसार नोंदणीकृत असावा. तसेच महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषद १९६५ अन्वये यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी असणे आवश्यक आहे.

C. भारतीय आयुर्विज्ञान आयोगाच्या दि.३०/०६/२०२५ च्या अधिसुचनेनुसार प्राध्यापक पदासाठी एकुण ०४ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोध निंबध (सहयोगी प्राध्यापक पदावर असताना ०२) व तसेच सहयोगी प्राध्यापक पदासाठी सहाय्यक प्राध्यापक पदावर असताना ०२ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोध निंबध असणे आवश्यक आहे.

D. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार उमेदवाराने BCME व BCBR हे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**०४. अनुभव :-**

A. प्राध्यापक पदाकरीता भारतीय आर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार पात्र असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक पदावर कमीत कमी ०३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

B. सहयोगी प्राध्यापक पदाकरिता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार पात्र असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक कमीत की ०४ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

C. सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता वरीष्ठ निवासी पदाचा एका वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

**०५. वयोमर्यादा:-**

१. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदाकरीता ७० वर्षापेक्षा कमी. शासन निर्णय क्र. एमईएस-१५०८/९४/०८/एमईडी, दि.०७/०९/२०११ अधिसुचनेनुसार सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता खुल्या प्रवर्गासाठी - ४० व मागासप्रर्वसाठी - ४५ वर्ष असेल.

**०६. मानधन:-**

१. प्राध्यापक पदाकरिता शा.वै.म.जालना रु.२,००,०००/- करार पध्दतीने ठोक मानधन.
२. सहयोगी प्राध्यापक पदाकरिता शा.वै.म.जालना रु.१,८५,०००/- करार पध्दतीने ठोक मानधन.
३. सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता शा.वै.म.जालना १,००,०००/-करार पध्दतीने ठोक मानधन.

**०७) अर्ज सादर करणेविषयी:-**

अर्ज सादर करावयाचा कालावधी:- **दि. १५/०७/२०२६ ते दि.२९/०७/२०२६ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत** संकेतस्थळावरुन अर्ज डाऊनलोड करुन अर्जातील नमुद परिपुर्ण माहिती (शैक्षणिक कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह ) **दि. ३०/०७/२०२६** सांयकाळी ५.०० पर्यंत किंवा त्यापुर्वी (सार्वजनिक सुट्टी वगळुन) हस्तपोच आवक विभागात स्विकारण्यात येईल.

**(सदरील जाहिरातीनुसार उमेदवाराने स्वतंत्ररित्या पदासाठी केलेल्या अर्जाच्या शुल्क रुपये - २००/-)**

**०८) अटी व शर्ती**

(शासन निर्णय क्र.एलईसी-२०२१/प्र. क्र.१९९/वैसेवा-३ दिनांक. ०९ फेब्रुवारी,२०२२, मधील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय क्र. एमईएस-१५०८/९४/०८ /एमईडी, दि.०७/०९/२०११ हे शासन निर्णय लागु राहील.)

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.
२. उमेदवारांचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.
३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा, विभागप्रमुख व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक आहे.
४. वरील प्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पदध्तीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. तसेच सदर कालावधीत कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असतील. (अध्यापकांना)

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे /माहिती व इतर सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास प्रथम नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारास करार पध्दतीने नियुक्ती देण्यात यावी. त्यामुळे शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित विचारात घेता उमेदवारांचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०. बिगर सेवानिवृत्त गटातुन करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदारांने संबंधित पदासाठी शारीरिकदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदरील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक तसेच पदांची करार तत्त्वावरील पद भरतीच्या जाहिरातीत अंशत:/पुर्णत: बदल करण्याचे अथवा सदरील जाहिरात रद्द करण्याचे सर्वाधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५. अर्जदाराचे नाव भारतीय वैद्यकीय परिषद, १९५६ नुसार नोंदणीकृत असावा. महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषद १९६५ यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी असणे आवश्यक आहे.

१६. उमेदवारास स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहावे लागेल, त्यासाठी कोणत्याही स्वरुपाचा मोबदला दिल्या जाणार नाही.खतीला येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्र सोबत आणणे बंधकारक राहील.

१७. सदरहु जाहिरात ही संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ www.gmcjalna.org संचालनालयाचे संकेतस्थळ-www.med-edu.in जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचे संकेतस्थळ www.jalna.gov.in यावर देखील प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जालना.

प्रत- मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण,संशोधन व आयुष मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना.
प्रत- संकेतस्थळ, आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई
प्रत- मा.जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
प्रत- कार्यालयीन संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जालना.
प्रत- संबधित विषयातील, तज्ञ अध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना
प्रत- मा.स्थानिक मंडळ अध्यक्ष तथा स्थानिक निवड सदस्य, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना यांना माहितीस्तव
प्रत- सर्व अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य यांना सुचना फलकावर प्रसिध्द करणेबाबत सादर.

Form No------

Date- / /2026

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE, JALNA**

To,

The Dean,

Government Medical College,

Jalna.

1. Application for the post of:- ----------------------------------------------------
2. Name in full (In Capital Letter):- ------------------------------------------------
3. Postal Address : - -----------------------------------------------------------------
4. Mobile No :- - ------------------
5. Email Id : -
6. Date of Birth:- -----/-------/---------
7. Age : - ----------
8. Caste Category: - -------------------
9. Date of Internship Completion:- -------/------/------
10. Bonded / non-bonded: - ----------------------------
11. Registration No: - ------------------------------------
12. Subject Preference: -
    1. ---------------------
    2. ---------------------
    3. ---------------------

| Sr. No. | Qualification | Year of Passing | Name of College | University | M.M.C./M.C.I Registration with date |
|---|---|---|---|---|---|
| 01 | U.G. | | | | |
| 02 | P.G. (Degree/Diploma) | | | | |
| 03 | Other | | | | |

13. Aggregate Marks obtained in final M.B.B.S. (Out of)- -----------/-----------
14. Aggregate Marks obtained in P.G. degreed/diploma (out of) -----------/--------
----
15. Attempt (U.G.)
    1. 1st Year M.B.B.S. -------------------
    2. 2nd Year M.B.B.S. -------------------
    3. 3rd Year M.B.B.S. -------------------
    4. 4th Year M.B.B.S. --------------------
16. P.G. (Degree / Diploma)
17. EXPERIENCE: -

- RESEARCH PAPER DETAILS

| Sr. No. | Research Paper | National Publish Year | International Publish Year | First / Second Correspondence | Indexing |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

- TEACHING EXPERIECNCE

| Sr. No. | Post Name | Name of the University/Institute | From Date | To Date | Period in Year | Period in Month |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

DECLARATION

The information furnished in this application form is complete and correct the best of my knowledge an any proof contrary to this will make me li

-able for necessary disciplinary action.

Place :-- ----------------

Date :- -----/-------/2026 Signature of Applicant

List of Attached Certificates: -

1. DOB certificate / S.S.C. School Leaving Certificate.
2. Marks sheets of $1^{st}$ to $4^{th}$ Year M.B.B.S. (All Pass / Fail Mark sheets) & P.G. Course.
3. Degree/Diploma Certificate.
4. Attempts Certificates.
5. M.M.C./M.C.I. Registration (Renewal)
6. Additional Qualification Certificate.
7. Caste Certificate / Cast Validity Certificate.
8. Post Experience Certificate please attach date wise.
9. Non -Creamy layer Certificate.
10. Domicile Certificate.
11. Basic Course in Biomedical Research Certificate.
12. Revised Basic Course In Medical Education Technology Certificate.
13. Publication.

Remarks of Scrutiny Committee - ------------------------------------------------------------
-